28 MAR 2022
लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दीपज्योतींनी उजळले शाहू छत्रपती समाधी स्मारक

## स्मृतिशताब्दी वर्षानिमित्त देवांग कोष्टी समाजाचा उपक्रम : कार्याचा वारसा पुढे नेणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : पोवाड्याचा सूर, जयजयकारामध्ये रविवारी सायंकाळी राजर्षी शाहू छत्रपती महाराज यांचे नर्सरी बाग येथील समाधी स्मारक सुमारे दोन हजार दीपज्योतींनी उजळले. स्मृती शताब्दीवर्षानिमित्त श्री देवांग कोष्टी समाजाने या उपक्रमाच्या माध्यमातून राजर्षी शाहू यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त केली. या समाजबांधव-भगिनींनी शाहू विचार आणि कार्याचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार केला.

या दीपोत्सवाचा प्रारंभ शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले. राजर्षी शाहूंचे स्मृती शताब्दी वर्ष आणि देवांग कोष्टी समाजाच्या वसतिगृहाची शंभर वर्षांची पूर्ती यानिमित्ताने आयोजित दीपोत्सवाच्या उपक्रमातून या समाजाने कृतज्ञता व्यक्त केली असल्याचे उपाध्यक्ष गजानन समंग यांनी सांगितले. त्यांनी समाज, वसतिगृहातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यावेळी देवांग कोष्टी समाजाचे अध्यक्ष रामचंद्र फातले, उपाध्यक्ष राम मकोटे, सचिव विलास मकोटे, बळीराम कवडे, 'सीआयडी'चे उपअधीक्षक उमेश हजारे, वसंतराव मुळीक, मालती सुतार, सुनील गाताडे, चंद्रकांत कोवळे, दिगंबर लोहार, ज्ञानेश्वर सुतार, इंद्रजित सावंत, शशिकांत पाटील, हर्षल सुर्वे, राहूल कवडे, रोहित फातले, पांडुरंग मकोटे, महादेव इदाते, संजय मकोटे, रूपेश रोडे, शशांक मकोटे, शैला मोरे, शुभांगी कवडे, विशाल मकोटे, आदी उपस्थित होते. संगीता मकोटे यांनी स्वागत केले. राधिका मुसळे यांनी प्रास्ताविक यांनी केले.



कोल्हापुरात रविवारी देवांग कोष्टी समाज आणि चौंडेश्वरी मंदिरातर्फे शाहू छत्रपती महाराज यांच्या स्मृतिशताब्दी वर्षानिमित्त नर्सरी बाग येथील समाधी स्मारक परिसरात दीपोत्सवाद्वारे कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. (छाया : नसीर अत्तार)

### पोवाड्याद्वारे जागर

या कार्यक्रमात शाहीर दिलीप सावंत, तृप्ती सावंत आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पोवाड्याद्वारे शाहू विचारांचा जागर घातला. समाजातील अबालवृद्ध या दीपोत्सवात सहभागी झाले. त्यांनी राजर्षी शाहूंचा जयजयकार केला.

28 MAR 2022 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दीपोत्सवाच्या माध्यमातून लोकराजाला मानाचा मुजरा

## रा. शाहू स्मृतिशताब्दी व देवांग कोष्टी समाज बोर्डिंग शतक महोत्सवानिमित्त आयोजन



कोल्हापूर : देवांग कोष्टी समाज बोर्डिंगच्या वतीने राजर्षी शाहू समाधीस्थळी कृतज्ञता दीपोत्सव करण्यात आला.

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

'जय राजर्षी-जय राजर्षी, तुजला हा मुजरा, शाहिराचा... सोशीत-पीडित कष्टकऱ्यांना आपण न्याय दिला, दिनदलित बहुजनांचा कनवाळू झाला...' या व अशा कवणांसह लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या कार्याचा गौरव करणाऱ्या पोवाडा गीतांनी अबालवृद्ध भारावले.

निमित्त होते लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची स्मृतिशताब्दी आणि देवांग कोष्टी समाज बोर्डिंगच्या शतक महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमाचे. राजर्षी शाहूंनी स्थापन केलेल्या बोर्डिंग याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने रविवारी नर्सरी बागेतील राजर्षी शाहू समाधीस्थळी हा कार्यक्रम झाला. यावेळी दीपोत्सवाच्या माध्यमातून देवांग कोष्टी समाजबांधवांनी लोकराजाला मानाचा मुजरा केला. सुमारे २ हजार पणत्या, नेत्रदीपक आतषबाजी आणि सप्तरंगी रांगोळ्या रेखाटून समाधी परिसर उजळवून टाकण्यात आला.


कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी अ. भा. मराठा महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष वसंतराव मुळीक, इतिहास संशोधक इंद्रजित सावंत, मोडी तज्ज्ञ अमित आडसुळे, हर्षल सुर्वे, दिगंबर लोहार आदींसह विविध क्षेत्रांतील मान्यवर व शाहूप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाहीर दिलीप सावंत, तृप्ती व दीप्ती सावंत यांनी राजर्षी शाहूंचे पोवाडे व गौरव गीते सादर करून प्रबोधन केले.

स्वागत संगीता मकोटे यांनी केले. प्रास्ताविक राधिका मुसळे यांनी केले. रूपाली कवडे, पूजा दौडे, नीता मकोटे यांनी सूत्रसंचालन केले. अनिता ढवळे यांनी आभार मानले. अध्यक्ष रामचंद्र फातले, गजानन समंग, विशाल मकोटे आदींनी संयोजन केले.

28 MAR 2022 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यशवंतराव चव्हाण यांच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घ्या : गवस



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात डॉ. उमेश गडेकर संपादित पुस्तकाचे प्रकाशन करताना डॉ. राजन गवस व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. सोबत अन्य.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आजच्या तरुण पिढीने यशवंतराव चव्हाण यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा सर्वंकष वेध घेण्याचा प्रयत्न करीत राहायला हवे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे यशवंतराव चव्हाण अध्यासन आणि यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने 'कर्मवीर भाऊराव पाटील, यशवंतराव चव्हाण व हमीद अली' या डॉ. उमेश गडेकर संपादित पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते. यावेळी प्रभारी संचालक डॉ. प्रकाश पवार, डॉ. उमेश गडेकर, संयोजक प्रा. गजानन साळुंखे, डॉ. नितीन माळी, चेतन गळगे, सुधीर देसाई, डॉ. संतोष सुतार, अमोल मिणचेकर, डॉ. वैशाली भोसले, डॉ. कविता वड्राळे, डॉ. ऊर्मिला दशवंत, डॉ. नीलम जाधव, मृणालिनी जगताप, परशुराम वडार, सागर वाळवेकर, डॉ. विशाल ओहाळ, डॉ. दादा ननवरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुण्यनगरी

# बहुविद्याशाखीय संशोधनाची गरज

## शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील

**पेठवडगाव : प्रतिनिधी**

कोरोना महामारीच्या काळात निर्माण झालेल्या समस्या नावीन्यपूर्ण पद्धतीने सोडवण्याची एक संधी आहे. बदलत्या जैव-पर्यावरणीय परिस्थितीत कोणतीही एक विद्याशाखा समस्या सोडवण्यास पुरेशी ठरणारी नसून, आता बहुविद्याशाखीय संशोधनाची गरज निर्माण झाली असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

ते श्री विजयसिंह यादव महाविद्यालयात प्राणिशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित 'कृषी, पशुधन व जैवविविधतेवर कोरोना : महामारीचा परिणाम' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन समारंभात बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष गुलाबराव पोळ होते. यावेळी शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. आशीष देशमुख यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. विजया चव्हाण यांनी केले. समन्वयक डॉ. राजाराम अतिग्रे यांनी आभार मांनले. पाहुण्यांचा परिचय डॉ. सूर्यकांत मस्के यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. ऐश्वर्या पवार यांनी केले.

28 MAR 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाहू महाराजांनी वसतिगृहे टिकविली

## कुलगुरू डॉ. शिर्के; देवांग कोष्टी समाज बोर्डिंग शताब्दी वर्षानिमित्त कार्यक्रम



कोल्हापूर : देवांग कोष्टी समाज बोर्डिंगचा शताब्दी महोत्सव आणि राजर्षी शाहू महाराजांच्या स्मृतिशताब्दी वर्षानिमित्त रविवारी राजर्षी शाहू समाधी स्थळासमोर दीपोत्सव झाला.
(मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा)

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २७ : राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी वसतिगृहांची केवळ मुहूर्तमेढ न रोवता ती टिकविण्याची सोय केली, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे केले. देवांग कोष्टी समाजाने बोर्डिंगची वेबसाईट करीत भावी पिढ्यांना विविध क्षेत्रासंबंधी मार्गदर्शन करावे, असा सल्लाही त्यांनी दिला. देवांग कोष्टी समाज बोर्डिंगचे शताब्दी वर्ष व राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतिशताब्दी वर्षानिमित्त आयोजित दीपोत्सव व शाहू विचार जागर पोवाडा कार्यक्रमात ते बोलत होते. नर्सरी बागेतील छत्रपती शाहू समाधी स्मारक परिसरात कार्यक्रम झाला. दरम्यान, समाधी परिसरात केलेल्या दीपोत्सवाने परिसर उजळून गेला.

डॉ. शिर्के म्हणाले, "शाहू महाराजांनी दूरदृष्टीतून सर्व समाजांसाठी वसतिगृहे सुरू केली. ती टिकविण्याची सोय त्यांनी केली. देवांग कोष्टी समाजातील विकसित झाला असून, उच्च पदस्थांचे मार्गदर्शन पुढच्या पिढीला होणे आवश्यक आहे. आयआयआयटीसारख्या संस्थांची माहिती त्यांना द्यावी."

बोर्डिंगचे उपाध्यक्ष गजानन समंग म्हणाले, "बोर्डिंगची स्थापना १९२१ ला पाडळकर मार्केट येथे झाली. बोर्डिंगच्या माध्यमातून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार केला जातो. शाहू राजांचा वैचारिक वारसा पुढे नेण्याचे काम केले जात आहे."

शाहीर दिलीप सावंत यांनी शाहू महाराज यांच्यावर आधारित पोवाड्यांचे सादरीकरण करत उपस्थितांना खिळवून ठेवले. शाहीर संजय गुरव यांनीही पोवाडे सादर केले. सुरेश काडगावकर (ढोलकी), पोपट वाघे (हार्मोनियम), भगवान आंबले, संभाजी पाटील, पपेश साळोखे यांनी संगीत साथ दिली. अध्यक्ष रामचंद्र फातले, उपाध्यक्ष राम मकोटे, सचिव विलास मकोटे, वसंतराव मुळीक, दिगंबर लोहार, इंद्रजित सावंत, ज्ञानेश्वर सुतार, हर्षल सुर्वे उपस्थित होते. रूपाली कवडे, पूजा दौंडे, नीता मकोटे यांनी सूत्रसंचालन केले. संगीता मकोटे यांनी स्वागत केले. राधिका मुसळे यांनी प्रास्ताविक केले. अनिता ढवळे यांनी आभार मानले.

### बोर्डिंगच्या शताब्दी वर्षानिमित्त कार्यक्रम

- ३ एप्रिलला मंगळवार पेठेतील चौंडेश्वरी हॉल येथे चित्रकला स्पर्धा
- १० एप्रिलला दुपारी चारला दसरा चौक ते पाडळकर मार्केट शाहू विचार जागर फेरी
- २४ एप्रिलला संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृहात मुख्य कार्यक्रम होणार आहे

28 MAR 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वीटभट्टी मजुराच्या मुलाची प्रेरक भरारी!

## 'एमपीएससी'तून 'रासायनिक विश्लेषक' पदावर नियुक्ती : कमवा व शिका योजनेतून शिक्षण पूर्ण

**संदीप खांडेकर : सकाळ वृत्तसेवा**


कोल्हापूर, ता. २७ : प्रा. सुनील बाळासाहेब पाटील तिसरीला असताना वडिलांचे निधन झाले. आईने वीटभट्टीवर काम करून शिक्षणासाठी त्यांना प्रोत्साहित केले. 'कमवा व शिका' योजनेतून त्यांनी शिक्षण घेताना परिस्थितीची जाणीव ठेवली. विज्ञान शाखेतून पदव्युत्तर पदवी मिळवून स्पर्धा परीक्षेची तयारी केली. महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे झालेल्या परीक्षेतून त्याची 'रासायनिक विश्लेषक' पदावर नियुक्ती झाली आणि संघर्षातून शिक्षण कसे घ्यावे, याची प्रचीतीच त्यांनी दिली.

प्रा. पाटील यांनी २०१८-१९ मध्ये परीक्षा दिली होती. त्याचा निकाल डिसेंबर २०१९ मध्ये



जाहीर झाला. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे नियुक्तीपत्र आले नव्हते. ते १८ मार्च २०२२ ला मिळाले. पाटील २१ मार्च २०२२ पासून सेवेत रुजू झाले. ते मूळचे इचलकरंजीच्या विठ्ठलनगर परिसरातील. काही काळ त्यांनीही वीटभट्टीवर काम केले. त्यांचे प्राथमिक शिक्षण परनाळ (ता. चिक्कोडी, जि. बेळगाव) येथील मराठी मुलांची शाळा, माध्यमिक अर्जुननगर (निपाणी) मोहनलाल दोशी विद्यालय, तर उच्च माध्यमिक शिक्षण देवचंद महाविद्यालयातून झाले.

वाळवा येथील क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालयातून बी.एस्सी.चे शिक्षण घेऊन मलकापुरातील रयत शिक्षण संस्थेच्या डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालयातून रसायनशास्त्र विषयातून विशेष प्रावीण्यासह पदवी मिळवली. त्यांचा शिवाजी विद्यापीठाने विशेष प्रावीण्य पुरस्कार देऊन गौरव केला. त्यानंतर त्यांनी डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवनात कमवा आणि शिका योजनेत सहभागी होऊन असेंद्रिय रसायनशास्त्र या विषयातील पदव्युत्तर पदवी मिळवली. संगणकशास्त्र, ग्रंथालयशास्त्र, आरोग्य पर्यावरण व औद्योगिक सुरक्षा या विषयातील पदव्युत्तर पदाविका विशेष प्रावीण्यासह त्यांनी मिळविल्या. सध्या रसायनशास्त्र विषयातील डॉक्टरेट पदवीसाठी त्यांचे संशोधन सुरू आहे.



**“ काम कोणतेही असो, ते मी प्रामाणिकपणे केले. माझी आर्थिक कुवत मजबूत नव्हती. कमवा व शिका योजनेतून शिक्षण पूर्ण करण्याशिवाय माझ्याकडे पर्याय नव्हता. महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे होणाऱ्या परीक्षांवर लक्ष केंद्रित केले. या परीक्षेतून पैसे न देता नोकरी मिळू शकते, याची जाणीव पक्की होती. त्यामुळे स्पर्धा परीक्षेचा कसून अभ्यास केला.**

**- प्रा. सुनील पाटील**

तरुण भारत

# डॉ. निलेश तरवाळ यांना 'सर्ब'तर्फे तारे ॲवॉर्ड जाहीर

## संशोधन प्रकल्पासाठी २२ लाखाचा निधी प्राप्त

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र अधिविभागाचे डॉ. निलेश तरवाळ यांना भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या वतीने 'सायन्स अँड इंजिनिअरिंग रिसर्च बोर्ड (सर्ब) तर्फे 'टीचर्स असोसिएटशिप फॉर रिसर्च एक्सेलन्स (तारे) ॲवॉर्ड जाहीर झाला आहे. डॉ. तरवाळ हे डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन अधीक्षकपदी कार्यरत आहेत.

भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागा तर्फे सायन्स अँड इंजिनिअरिंग रिसर्च बोर्डच्या वतीने दरवर्षी देशातील संशोधकांकडून संशोधन प्रकल्प प्रस्ताव मागवले जातात. त्यातील निवडक उत्कृष्ट संशोधन प्रकल्पाला 'सर्ब–तारे' ॲवॉर्डने गौरविले जाते. डॉ. तरवाळ यांनी मेटल ऑक्सॉइड बेस्ड पर्वोस्काइट सोलर सेल्स या विषयावर सादर केलेल्या संशोधन प्रकल्पाची निवड झाली आहे. यामध्ये डॉ. तरवाळ सोलर सेल निर्मितीसाठी विषारी धातू ऐवजी बिनविषारी तसेच पर्यावरणपूरक धातूंचा वापर करणार



आहेत. सध्या वाढत चाललेली लोकसंख्या आणि त्याप्रमाणे लागणारी ऊर्जा संसाधने, त्यांच्या वाढत चाललेल्या किमती लक्षात घेता आपणाला गरज आहे ती स्वच्छ आणि स्वस्त अक्षय ऊर्जेची. उर्जेचा जास्तीत जास्त वापर करण्याची या प्रकल्पामधून निर्माण होणारे तंत्रज्ञान हे ऊर्जानिर्मितीसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. या संशोधन प्रकल्पासाठी आय.आय.टी. इंदोर या नामांकित संशोधन संस्थेमधील डॉ. पी. एम. शिरगे यांच्यासोबत संशोधन करण्याची संधी प्राप्त झाली असून डॉ. तरवाळ यांना २२ लाखांचा निधी प्रकल्पासाठी मिळणार आहे.

यासाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही एन शिंदे, डॉ. के वाय राजपुरे, डॉ. व्ही. जे. फुलारी यांचे सहकार्य लाभले.

तरुण भारत

# शाहू महाराज समाधीस्थळ नर्सरी बाग येथे दीपोत्सव

- कोष्टी समाज वसतिगृहाच्या शताब्दी महोत्सवी वर्षानिमित्त कार्यक्रम
- राजर्षी शाहू महाराजांच्या विचाराचा वारसा जपा - कुलगुरु डॉ. शिर्के

प्रतिनिधी
कोल्हापूर

सर्वसामान्य कुटुंबातील मुलांना शिक्षण मिळावे, यासाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी प्रत्येक समाजासाठी एक वसतिगृह स्थापन केले. शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार करून अनेकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणले. शाहू महाराज यांनी स्थापन केलेल्या कोष्टी समाजाच्या वसतिगृहाचे शताब्दी वर्ष आज साजरे होत आहे. त्यामुळे राजर्षी शाहूंच्या विचाराचा वारसा जपला पाहिजे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

श्री देवांग कोष्टी समाजातर्फे कोष्टी समाज वसतिगृह शताब्दी महोत्सव व राजर्षी शाहू महाराज स्मृती शताब्दी वर्षानिमित्त राजर्षी शाहू महाराज समाधीस्थळ नर्सरी बाग येथे दीपोत्सव करण्यात आला. या दीपोत्सवाच्या उद्घाटनानंतर ते बोलत होते. शाहीर दिलीप सावंत यांनी पोवाड्यातून शाहूंच्या विचाराचा जागर केला.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, राजर्षी शाहू महाराज यांनी सक्तीचे शिक्षण कायदा तयार केला. त्यांनी शिक्षण, उद्योग, बांधकाम, कला, शेती, पाणी क्षेत्रात कार्य केले. त्यांनी दूरदृष्टी ठेवून स्थापन केलेल्या वसतिगृह चळवळीमुळे कोल्हापुरात शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निवासाचा व भोजनाचा प्रश्न मिटला आहे. समाजाचे संकेतस्थळ तयार करून समाजातील यशस्वी विद्यार्थ्यांची माहिती ठेवा. समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी बळ द्या, असा सल्ला दिला. दिपोत्सवाने शाहू समाधीस्थळ उजळून गेले होते. प्रास्ताविक राधिका मुसळे यांनी केले. सुत्रसंचालन रुपाली कवडे व पुजा दौंडे यांनी केले. अनिता ढवळे यांनी आभार मानले. यावेळी रामचंद्र फातले, गजानन समंग, विलास मकोटे, बळीराम कवडे, महादेव इदाते, पांडूरंग कवडे, संजय मकोटे, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
2 8 MAR 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




पेठ वडगाव : राष्ट्रीय परिषदेत मार्गदर्शन करताना प्र–कुलगुरू डॉ. पी एस. पाटील, व्यासपीठावर मान्यवर.

# 'बहुविद्याशाखीय संशोधनाची गरज'

प्रतिनिधी
पेठ वडगाव

कोरोना काळात निर्माण झालेल्या समस्या नाविन्यपूर्ण पद्धतीने सोडविण्याची एक संधी आहे. बदलत्या जैव–पर्यावरणीय परिस्थितीत कोणतीही एक विद्याशाखा समस्या सोडवण्यास पुरेशी ठरणारी नसून बहुविद्याशाखीय संशोधनाची गरज निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

येथील श्री विजयसिंह यादव महाविद्यालयात प्राणीशास्त्र विभागाच्यावतीने आयोजित कृषी, पशुधन व जैवविविधतेवर कोरोना महामारीचा परिणाम या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष गुलाबराव पोळ होते.

डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, शिवाजी विद्यापीठातील संशोधकांनी कोरोना काळात अनेक जागतिक संस्थांच्या सामंजस्याने कोरोनापासून बचाव करण्याच्या विविध उपाययोजनांच्या निर्मितीत मोलाचे योगदान दिले आहे. या महामारीच्या काळात तंत्रज्ञानाचा नाविन्यपूर्ण पद्धतीने वापर करण्याच्या विविध संधी मिळाल्या असून विद्यार्थ्यांनी आपला कल ओळखून नाविन्यपूर्ण संशोधनाकडे वळावे, असे आवाहन त्यांनी केले. प्राणीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. आशिष देशमुख यांनी महामारी विरुद्ध मानवाची लढाई ही एक निरंतर प्रक्रिया असून आपण त्यासाठी स्वतःला सक्षम बनवायला हवे असे सांगितले. संस्थेचे अध्यक्ष गुलाबराव पोळ यांनी या महामारीच्या काळात लोकांनी उदार मानवतेचे दर्शन घडवून अनेकांना मदत केली. या प्रक्रियेत शिक्षक, संशोधक व विद्यार्थीही अग्रेसर होते असे सांगितले. स्वागत प्राचार्या डॉ. विजया चव्हाण यांनी केले. आभार कार्यशाळेचे समन्वयक डॉ. राजाराम अतिग्रे यांनी मानले. पाहुण्यांचा परिचय डॉ. सूर्यकांत मस्के यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. ऐश्वर्या पवार यांनी केले.